लोकमत

# 'व्यंकटेश्वरा'ने केले इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट

लोकमत न्यूज नेटवर्क

**इस्लामपूर :** पेठनाका (ता. वाळवा) येथील व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेच्या नानासाहेब महाडिक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी कृष्णा आणि वारणा नदीकाठावर आलेल्या महापुरात बाधित झालेल्या घरांचे स्ट्रक्चरल ऑडिट केले. यातून पूरग्रस्तांना मदतीचा हात दिला. या उपक्रमात सिव्हिल इंजनिअरिंग विभागाचे ६० विद्यार्थी सहभागी झाले होते.

वाळवा, शिराळा तालुक्यातील धोत्रेवाडी, तांबवे, कासेगाव, कोळे, नरसिंहपूर, शिरटे, शिरगाव, मर्दवाडी, कृष्णानगर, कारंदवाडी, मिरजवाडी, चिकुर्डे, देवर्डे, ऐतवडे खुर्द, कुंडलवाडी, तांदुळवाडी आदी गावातील लोकांना याचा फायदा झाला. विद्यार्थ्यांनी पंचायत समिती बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हे ऑडिट केले. त्यांना व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेचे सचिव राहुल महाडिक, कार्यकारी संचालक महेश जोशी, प्राचार्य डॉ. व्ही. ए. कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले.

हॅलो सांगली, बुधवार, दि. ४ सप्टेंबर २०१९ ३

# महाडिक अभियांत्रिकीस व्हर्च्युअल लॅब नोडल सेंटरला मान्यता

**इस्लामपूर :** पेठनाका (ता. वाळवा) येथील महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालयास आयआयटी, मुंबईच्या व्हर्च्युअल लॅब नोडल सेंटरला मान्यता मिळाली असून संस्थेसाठी ही अभिमानाची बाब आहे, अशी माहिती कार्यकारी संचालक महेश बी. जोशी यांनी दिली.

जोशी म्हणाले, 'व्हर्च्युअल लॅब अ टूल इन इंटरनेट बेस्ड् एक्सपेरीमेंटेशन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली, या कार्यशाळेस आयआयटीचे प्रोजेक्ट को-ऑर्डिनेटर पुष्पदीप मिश्रा, तनुजा खटावकर, मीनल अपसंगी व मनीष नागोशे उपस्थित होते.

सुरुवात प्राचार्य डॉ. व्ही. ए. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी शिक्षकांसाठी व्हर्च्युअल लॅबचे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. प्रा. नीलेश साने यांनी आभार मानले.